**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक:-16/12/2020**

**महंमद ऊर्फ बाबा हैदरअली शेख, वय 53 वर्ष, आर.टी.ओ.एजंट, आर.टी.ओ. कार्यालय, उस्मानाबाद यांनी 1000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | महंमद ऊर्फ बाबा हैदरअली शेख, वय 53 वर्ष, आर.टी.ओ.एजंट, आर.टी.ओ. कार्यालय, उस्मानाबाद रा.बेंबळी, ता.जि. उस्मानाबाद |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.16.12.2020 रोजी आर.टी.ओ. कार्यालयासमोर प्रविण ऑनलाईन सेंटरचे बाजुस गोपाळ मिसाळ यांनी भाडयाने घेतलेल्या वैभव ऑनलाईन सेंटरमध्ये |
| तपासी अधिकारी | श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | 3500/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन1000/- रु |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे टु व्हिलर व फोर व्हिलर चे लायसन्स काढुन देण्यासाठी आणि ऑलनाईन परिक्षा पास करुन देण्यासाठी |

यातील तक्रारदार हे शेती व्यवसाय व शिक्षण घेत असुन त्यांना टु व्हिलर व फोर व्हिलर चे लायसन काढुन देण्यासाठी व ऑनलाईन परिक्षा पास करुन देण्यासाठी आर.टी.ओ.एजंट शेख यांनी तक्रारदार यांचेकडे 3500/- रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना आर.टी.ओ.एजंट शेख यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.16.12.2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री.गौरीशंकर पाबळे यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने आर.टी.ओ.एजंट शेख यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कामासाठी पंचासमक्ष 3500/-रुपये लाचेची मागणी करुन 3500/- रु लाच रक्कमेपैकी पहिला हप्ता म्हणुन 1000/- रु लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे आज दि.16.12.2020 रोजी सापळा आयोजीत केला असता महंमद ऊर्फ बाबा हैदरअली शेख, वय 53 वर्ष, आर.टी.ओ.एजंट, आर.टी.ओ. कार्यालय, उस्मानाबाद यांनी आर.टी.ओ. कार्यालयासमोर प्रविण ऑनलाईन सेंटरचे बाजुस गोपाळ मिसाळ यांनी भाडयाने घेतलेल्या वैभव ऑनलाईन सेंटरमध्ये तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्यां मागणीप्रमाणे पहिला हप्ता म्हणुन 1000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे आनंद नगर, उस्मानाबाद येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ.राहुल खाडे, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद व श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक यांनी केली असुन सदर कारवाईस पोना/मधुकर जाधव, पोकॉ/विष्णु बेळे, विशाल डोके यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

1) मा.डॉ.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8888807299

2) श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100

3) **टोल फ्री क्र. 1064**, दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID:-** dysposmanabad@gmail.com

**( गौरीशंकर पाबळे )**
**पोलीस निरीक्षक**
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद